नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :–२२/३/२०१८

–: परिपत्र :–

पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्र. १ (के) अन्वये, मंगळवार दि. २० मार्च २०१८ रोजी दुपारी ३–०० (तीन) वाजता भरलेल्या माहे मार्च २०१८ या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करुन घेण्यात आलेले विषय.

विषय क्र.१/१०७७

संदर्भ – १) मा.प्रशांत जगताप व मा.सौ.रत्नप्रभा जगताप यांचे दि. ५/३/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. २३१८,दि.१५/३/२०१८

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. २५ ड एस.आर.पी.ग्रुप नं. १ येथे पुणे महानगरपालिकेच्या वतीने बांधण्यात येणाऱ्या क्रिडासंकुलाचे उर्वरित काम करणेसाठी र.रू.२५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२३६, अ.क्र.३४७, प्रभाग क्र. २५ ड, एस.आर.पी.ग्रुप नं. २ येथे बचत गटांकरीता मार्गदर्शन केंद्रे तथा विक्री केंद्रे उभारणे	२५ लाख	–––
नवीन सुचविलेले काम–		
प्रभाग क्र. २५ ड एस.आर.पी.ग्रुप नं. १ येथे पुणे महानगरपालिकेच्या वतीने बांधण्यात येणाऱ्या क्रिडासंकुलाचे उर्वरित काम करणे	–––	२५ लाख

विषय क्र.२/१०७८

संदर्भ – १) मा.सौ.आरती कोंढरे यांचे दि. ७/३/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. २३२०,दि.१५/३/२०१८

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. १८ ब मध्ये प्लॅस्टिक बॉटल क्रश करण्यासाठी प्लॅस्टिक बॉटल श्रीडींग मशीन बसविणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२३३, अ.क्र.२३७, प्रभाग क्र. १८ ब पोलिस चौकीचे विविध विकास कामे करणे	१० लाख	–––
नवीन सुचविलेले काम–		
प्रभाग क्र.१८ ब मध्ये प्लॅस्टिक बॉटल क्रश करण्यासाठी प्लॅस्टिक बॉटल श्रीडींग मशीन बसविणे	–––	१० लाख

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्र.३/१०७९

संदर्भ – १)मा.अजय खेडेकर ,मा.सौ. ज्योती गोसावी,मा.सौ.मुक्ता जगताप,मा.सौ.संगिता ठोसर ,मा.सौ.अर्चना

रुग्णांस १००% हमीपत्रांतर्गत आर्थिक लाभ देणेबाबत

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

संदर्भ क्रमांक ४ अन्वये, पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात झोपडपट्टयांमध्ये वास्तव्यास असणाऱ्या नागरीकांसाठी आरोग्य विम्याअंतर्गत शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजना ठराव पारित झाला असून महानगरपालिकेतर्फे एका आर्थिक वर्षासाठी एका कुटूंबासाठी रक्कम रुपये १,००,०००/– या कमाल मर्यादेपर्यंत पॅनेलवरील खाजगी रुग्णालयांमधील अंर्तरुग्ण विभागातील वैद्यकीय उपचारार्थ ५०% हमीपत्राव्दारे, सी.जी.एच.एस. मान्य दराने आर्थिक लाभ देण्यात येतो.

शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजनेअंतर्गत सभासदत्व घेतलेल्या कॅन्सरग्रस्त रुग्णांना, किमोथेरपी, रेडिएशन, पेट स्कॅन तपासणी व शस्त्रक्रिया या वैद्यकीय उपचारांसाठी संबंधित खाजगी रुग्णालयाचे नावे नियमानुसार १००% अथवा ५०% चे हमीपत्र देण्यात येवून वैद्यकीय उपचारांमध्ये रक्कम रुपये १,००,०००/– या कमाल मर्यादेपर्यंत आर्थिक लाभ देण्यात येतो.

<u>सदयस्थितीत किमोथेरपी वैद्यकीय उपचारांसाठी अनुज्ञेय आर्थिक लाभ</u>–

कॅन्सर या गंभीर आजारावरील किमोथेरपी वैद्यकीय उपचार घेणाऱ्या रुग्णांना योजनेअंतर्गत रक्कम रुपये १,००,०००/– पैकी रक्कम रुपये २५,०००/– पर्यंत १००% चे हमीपत्र संबंधित खाजगी रुग्णालयाचे नावे देण्यात येते. म्हणजेच रक्कम रुपये २५,०००/– पर्यंत कॅन्सर आजारावरील किमोथेरपी या वैदयकीय उपचारांचे बीलाची रक्कम, खाजगी रुग्णालय प्रशासनास रुग्णास अदा करावी लागत नसून शहरी गरीब वैदयकीय सहाय्य योजनेअंतर्गत संपूर्ण बील सी.जी.एच.एस.दरपत्रकानुसार संबंधित रुग्णालय प्रशासनास अदा करण्यात येते.

तदनंतर म्हणजेच रक्कम रुपये १,००,०००/– पैकी रक्कम रुपये २५,०००/– पुर्णतः संपलेवर, उर्वरीत रक्कम रुपये ७५,०००/– पर्यंत ५०% चे हमीपत्र संबंधित खाजगी रुग्णालयाचे नावे रुग्णांवरील किमोथेरपी उपचारांसाठी सद्यस्थितीत देण्यात येते. सदर ५०% चे हमीपत्रांतर्गत प्रत्येक किमोथेरपी उपचारांचे अंतिम बिलापैकी ५०% रक्कम खाजगी रुग्णालय प्रशासनास रुग्णांना अदा करावी लागते. खाजगी रुग्णालय प्रशासनाकडून उर्वरीत ५०% रक्कमेचे बील शहरी गरीब योजना कार्यालयात आवक झाल्यावर सी.जी.एच.एस.दरपत्रकानुसार तपासले जावून, रुग्णालयास संबंधित बीलाचे परताव्याची रक्कम अदा करण्यात येते.

<u>सदयस्थितीत रेडिएशन, पेट स्कॅन तपासणी, शस्त्रक्रिया इ. वैद्यकीय उपचारांसाठी अनुज्ञेय आर्थिक लाभ</u>–

कॅन्सर या गंभीर आजारावरील रेडिएशन, पेट स्कॅन, सी.टी.स्कॅन., एम.आर.आय. तपासणी शस्त्रक्रिया तसेच शस्त्रक्रियेपूर्वीच्या तपासण्या (Preinvestigations) हे वैदयकीय उपचार आवश्यक असणाऱ्या रुग्णांना योजनेअंतर्गत रक्कम रुपये १,००,०००/– या कमाल मर्यादेपर्यंत ५०% चे हमीपत्र संबंधित खाजगी रुग्णालयाचे नावे सद्यस्थितीत देण्यात येत आहे. सदर ५०% चे हमीपत्रांतर्गत रेडिएशन, पेट स्कॅन तपासणी व शस्त्रक्रिया या वैद्यकीय उपचारांचे अंतिम बीलापैकी ५०% रक्कम खाजगी रुग्णालय प्रशासनास रुग्णांना अदा करावी लागते. खाजगी रुग्णालय प्रशासनाकडून उर्वरीत ५०% रक्कमेचे बील शहरी गरीब योजना कार्यालयात आवक झालेवर, सी.जी.एच.एस. दरपत्रकानुसार तपासले जावून, रुग्णालयास संबंधित बीलाचे परताव्याची रक्कम अदा करण्यात येते.

गंभीर आजारावरील वैद्यकीय उपचारांतर्गत मोठया रकमेच्या अंतिम बीलापैकी ५०% रक्कम संबंधित खाजगी रुग्णालय प्रशासनास अदा करणे गरीब रुग्णांना आर्थिकदृष्टया परवडणारे नसते. या अनुषंगाने, संदर्भ क्रमांक ३ मध्ये प्रस्तावित केल्यानुसार, शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजनेअंतर्गत सभासदत्व घेतलेल्या व पॅनेलवरील खाजगी रुग्णालयांमध्ये कॅन्सर या गंभीर आजारावरील किमोथेरपी, रेडिएशन वैदयकीय उपचार तसेच पेट स्कॅन, सी.टी.स्कॅन, एम.आर.आय. तपासणी व शस्त्रक्रिया आणि शस्त्रक्रियेपूर्वीच्या तपासण्या (Preinvestigations) या पैकी कोणताही वैद्यकीय उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी, योजनेची कमाल मर्यादा रक्कम रुपये १,००,०००/–पर्यंत, संबंधित खाजगी रुग्णालयाचे नावे १००% चे हमीपत्र देवून, जनरल वॉर्डच्या सी.जी.एच.एस.मान्य दराने, एकूण वैद्यकीय बीलाच्या १००% प्रमाणे, संपूर्ण रक्कम संबंधित रुग्णालय प्रशासनास पुणे म.न.पा. मार्फत अदा करून, गरीब रुग्णांना वैदयकीय सेवा उपलब्ध करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र.४/१०८०</u>

उपक्रम सन २०१७–२०१८ या आर्थिक वर्षामध्ये सुरू करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्यसभेकडे शिफारस आहे.

१) सन २०१७–२०१८ या आर्थिक वर्षाकरीता हॅलो माय फ्रेंड उपक्रम राबविणेस.

२) हॅलो माय फ्रेंड उपक्रमा करीता सन २०१७–२०१८ आर्थिक वर्षात ४ क युवक कल्याणकारी योजना निधी अंतर्गत FE14D125 (हॅलो माय फ्रेड योजना राबविणे) या अर्थशिर्षकावरील र. रू. ६ लाख तरतूदीमधून खर्च करणेस.

३) सदर उपक्रम राबविणेकरीता वर्गीकरणाद्वारे सिस्टिम कार्यान्वित करणे, समुपदेशिका मानधन बील तसेच टेलिफोन बील, जाहिरात व इतर तद्नुषंगिक बाबींसाठी खर्च इ. करीता अधिक रक्कम रू. ४ लाख तरतूद उपलब्ध करणेस.

४) सदर उपक्रम पुणे शहरात राबविणेकरीता मा. मुख्य सभेची मान्यता मिळाल्यानंतर खालीलप्रमाणे हॅलो माय फ्रेंड उपक्रम राबविणेस.

अ. पुणे महानगरपालिका, हॅलो माय फ्रेंड उपक्रम मंगळवार पेठ, पुणे ११ येथील कमला नेहरू हॉस्पिटल या ठिकाणी सुरू करणेस

ब. हॅलो माय फ्रेंड उपक्रमा करीता टोल फ्री क्रमांक द्वारे समुपदेशन करणे करीता आवश्यक सॉफ्टवेअर तयार करून घेणे. या पोटी होणाऱ्या खर्चास. या सॉफ्टवेअर मार्फत बल्क एसएमएस पाठविणे, समुपदेशन कामी दुरध्वनीवर झालेली चर्चा रेकॉर्ड करणेस

क. हॅलो माय फ्रेंड उपक्रम अंतर्गत समुपदेशन करणे कामी लोकल कॉल करणे, एसटीडी कॉल करणे, एसएमएस करणे या करीता होणारा खर्च करणेस

ड. हॅलो माय फ्रेंड उपक्रम अंतर्गत समुपदेशन करणे करीता दोन समुपदेशक नेमणे व त्यांच्या मानधना पोटी होणारा खर्च करणेस

इ. हॅलो माय फ्रेंड उपक्रम अंतर्गत तज्ञ व्यक्तिंचे मार्गदर्शन कार्यक्रम (करिअर गाईडन्स, कौटुंबिक समस्या, मानसिक ताणतणाव, वैयक्तिक समस्या इ.) आयोजित करणे करीता येणारा खर्च, जाहिरात–वर्तमानपत्र, आकाशवाणी, रेडीओ मिर्ची, छापील साहित्य व इतर तद्नुषंगिक बाबींसाठी होणाऱ्या खर्चास.

<u>विषय क्र.५/१०८१</u>

संदर्भ – १) महाराष्ट्र शासन राजपत्र ६ मार्च २००८ भाग १० (२३/१)

२) मा. स्थायी समिती ठ.क्र. ४२९, दि. २१/०६/२०११.

३) मा. महापालिका सभा ठ.क्र.२९३, दि. २५/०७/२०११.

४) श्री. योगी अरविंद सांस्कृतिक मंच यांचेशी पुणे मनपाने दि. १३/०७/२०१२ रोजी केलेला नोंदणीकृत करारनामा.

५) मा. स्थायी समिती ठराव क्र. ५९१, दि. १६/०८/२०१७.

६) मा. प्रभाग समिती (धनकवडी सहकारनगर) ठराव क्र.५, दि.३०/११/२०१७.

७) श्री. योगी अरविंद सांस्कृतिक मंच यांचे महापालिका सहाय्यक आयुक्त धनकवडी सहकारनगर पुणे महानगरपालिका आवक क्र.मआस/धस/७५०२,दि.१/१२/२०१७ रोजीचा मुदतवाढीबाबतचा अर्ज.

८) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परिमंडळ–३/११५९ दि.१२/३/२०१८ चे पत्र.

९) मा.स्थायी समिती ठराव क्र. २३७०,दि.१५/३/२०१८

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

प्रभाग क्र. ३५ मधील स.नं.८५/८६, सि.स.नं. १७८२ सहकारनगर नं. २ पर्वती येथील पुणे मनपाची बालक्रिडा भवनाची मिळकत (बांधकाम क्षेत्रफळ ८१.३० चौ.मी.) श्री.योगी अरविंद सांस्कृतिक मंच या सामाजिक संस्थेस दि.१३/७/२०१७ ते १२/७/२०२२ या ५ वर्षे कालावधीसाठी देखभाल व व्यवस्थापनासाठी मिळकत वाटप नियमावली २००८ च्या तरतुदीस अधिन राहून विनामोबदला देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र.६/१०८२</u>

रूपये ४००/– ने जास्त असल्याने त्यांनी देऊ केलेली वार्षिक र.रुपये ४,३७,८००/– स्विकारुन सदरचा जलतरण तलाव शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रक्कमेवर वस्तु आणि सेवाकर भरुन घेणेस ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तींप्रमाणे मक्ता पध्दतीने देणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ आणि मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतुदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

विषय क्र.७/१०८३

संदर्भ – १) मा.सौ.ज्योती गोसावी यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र. २३८९,दि.१५/३/२०१८

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ३४ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक,		
१)४. झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन निधीतून करावयाची कामे, पान क्र. १३६, अ.क्र. ३, सुलभ पध्दतीची शौचालये बांधणे, (यादी क्र.एसजी २), पान क्र. २६३, अ.क्र.१८८, प्रभाग क्र. ३४ ब मधील विविध ठिकाणच्या मुताऱ्या व शौचालयांची रंगरंगोटी करणे, दुरुस्त्या करणे व तदनुषंगिक कामे करणे	१० लाख	–––
२) १०.ख.वाहतूक नियंत्रण, पान क्र. १०२, अ.क्र. १, शहरामधील चौकांची सुधारणा/विकासकामे करणे, (यादी क्र. एसटी१), पान क्र.१९३, अ.क्र.४४, प्रभाग क्र.३४ब, मधील तुकाईनगर चौक सुशोभिकरण करणे.	१० लाख	–––
नविन सुचविलेली कामे–		
१) प्रभाग क्र. ३४ ब मध्ये सनसिटी परिसरात रस्ते डांबरीकरण करणे	–––	१० लाख
२) प्रभाग क्र. ३४ ब मध्ये हिंगणे खुर्द परिसरात रस्ते डांबरीकरण करणे	–––	१० लाख

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्र.८/१०८४

पुणे मनपा हद्दीतील उद्याने,रस्ते, पूल, चौक इत्यादी सार्वजनिक ठिकाणांना योग्य त्या नावांची शिफारस करण्याबाबत झालेला मनपा ठराव क्र. ४, दि. २०/४/२०१७ ला अनुसरुन दि.९/३/२०१८ रोजी दुपारी ३=३० (साडे तीन) वाजताचे नाव समितीचे निवेदन विचारासाठी.

विषय क्र.९/१०८५

संदर्भ – १) मा.महेश वाबळे व मा.सौ.वस्ते यांचे दि.९/० ३/२०१८ चे पत्र

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.६१७, दि. ९/० ३/२०१८

––––

शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिका हद्दीतील स.नं.५८७ च्या मिळकतीवर नवीन विकास आराखडा ९ मीटरचा नवीन डी.पी.रोड प्रस्तावित केला आहे. त्यास समांतर बिबवेवाडी–लुल्लानगर हा ३० मीटर डी. पी.रस्ता असून नवीन विकास आराखडयात तो ४२ मीटर दर्शविला आहे.स.नं.५८७ या मिळकतीतील ९ मीटर डी.पी.रस्ता बिबवेवाडी–लुल्लानगर या मुख्य रस्त्यास जोडणे आवश्यक असून त्याकरिता बु–हाणी कॉलनी आणि न्यू इरा कॉलनी यांचा स.नं.५८८ या ले –आउट मधील १२ मीटर रस्ता कलम २०५ खालील रस्ता म्हणून आखणे आवश्यक आहे.सदर दोन्ही कॉलनीमधील सदर १२ मीटर डांबरी रस्ता व स्ट्रीट लाईटस इत्यादी कामे व त्यांची देखभाल दुरुस्ती पुणे

पुणे महानगरपालिकेच्या इस्टीमेट कमिटी, २०५ कमिटी व ॲमिनिटी स्पेस कमिटी या कमिटीवर शहर सुधारणा समितीचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा समावेश करण्यात यावा अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

विषय क्र.११/१०८७

संदर्भ – १) मा.बी.ओ.टी. समितीचे दि.२६/१०/२००७ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त
२) मनपा निविदा जाहिरात क्र. ३/४ दि.५/४/२०१०
३) मा.स्थायी समिती ठराव क्र. १७८, १७९ दि. २/६/२००९
४) प्रोजेक्ट आर्किटेक्ट प्रदिप पेठे ॲन्ड असोसिएट्स यांचे पत्र आ.क्र. १०४५ दि. १४/६/२०१०
५)प्रोजेक्ट आर्किटेक्ट बी.बी.अधिकारी यांचे पत्र दि. १४/६/२०१०
६)मा.स्थायी समिती ठराव क्र. २२३१ दि. १७/१/२०११
७)मा.मुख्य सभा ठराव क्र. ४४४ दि. १७/१/२०११
८) महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे मनपा दि. २८/९/२०१७ चे बैठकीचे इतिवृत्त
९) महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे येथे झालेली मनपा कॉलनी क्र. ८ व ९ बाबत दि.२/११/२०१७ रोजी झालेली चर्चा
१०) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/११६१ दि.१२/३/२०१८ चे पत्र.
११) मा.स्थायी समिती ठराव क्र. २४३१,दि.२०/३/२०१८

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे महानगरपालिकेच्या घोरपडे पेठ कॉलनी क्र. ८ व ९, राजेंद्रनगर वसाहत, मंगळवार पेठ कॉलनी क्र.२, शुक्रवार पेठ बुरुड चाळ वसाहत आणि पांडवनगर वसाहत बीओटी तत्वावर विकसित करणेसाठी आलेल्या मान्यता प्राप्त टेंडर दाराकडून (मे.पाटील कन्स्ट्रक्शन) यांचेकडून पुर्वमान्य क्षेत्रानुसार काम करुन घेण्यास तथापि सदनिकांचे क्षेत्र ३० चौ.मी. + ७.५ चौ.मी. टेरेस ऐवजी ४५ चौ.मी. + ७.५ चौ.मी. टेरेसच्या याप्रमाणे इमारती बांधून घेणेस तसेच सदनिका संख्या तात्पुरती कमी करुन व एकूण बांधकाम क्षेत्र कायम ठेवून पुर्व मान्य अटीशर्तीनुसार विकसकाबरोबर करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

विषय क्र.१२/१०८८

संदर्भ – १) मे.व्ही.एम.कन्सलटंट, स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचा अहवाल
२) मा.बी.ओ.टी. समितीचे दि.७/२/२००८ चे बैठकीचे इतिवृत्त
३) निविदा क्र. ५२–२००८ दि.२३/४/२००८
४) निविदा क्र. ८–२०१० दि.७/५/२०१०
५) मा.मुख्य सभा ठराव क्र. ४८९ दि. २१/१/२००९
६) मा.स्थायी समिती ठराव क्र. २६५० दि. १८/२/२०११
७) मा.मुख्य सभा ठराव क्र. ४७४ दि. १८/२/२०११
८) महापालिका आयुक्त कार्यालय,पुणे मनपा जा.क्र. मआ/जनेशपुअ क्र.२/१११२ दि. १/२/२०११ चे निवेदन
९) महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे मनपा दि. २८/९/२०१७ चे बैठकीचे इतिवृत्त
१०) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/११६२ दि.१२/३/२०१८ चे पत्र.
११) मा.स्थायी समिती ठराव क्र. २४३२,दि.२०/३/२०१८

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे महानगरपालिकेची वसाहत स.नं. ६८ फा.प्लॉट नं. २९,सानेगुरूजी (अंबिल ओढा) वसाहत बी.ओ.टी. तत्वावर पुर्न:विकसीत करताना यापुर्वी मा.मुख्य सभा ठराव क्र. ४७४ दि.१८/२/२०११ अन्वये मान्य झालेल्या ठरावानुसार मे. मानव प्रमोटर्स यांचेकडून ३० चौ.मी. + ९चौ.मी. टेरेस ऐवजी ४५ चौ.मी. + ९ चौ.मी. टेरेस याप्रमाणे एकूण १५,५७० चौ.मी. क्षेत्र मनपास बांधुन देण्यास व त्यापोटी विकसकास यास मा.मुख्य सभा ठराव क्र. ४७४ दि.१८/२/२०११ नुसार ६१७४ चौ.मी. क्षेत्र ९९ वर्षेकरीता (३०+३०+३०+९) यानुसार भाडेतत्वावर

५) मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग, पुणे मनपाकडील पत्र जा.क्र.५५०८, दि.१०/०१/२०१८
६) मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग,पुणे मनपाकडील पत्र जा.क्र.७४०५,दि. ०१/०३/२०१८
७) मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग,पुणे मनपाकडील पत्र जा.क्र.७६९२,दि. ०९/०३/२०१८
८) आपले विभागाकडील जा.क्र. खपावि/बि.सिं/१६४७/सन १८, दि.०५/०३/२०१८ चे पत्र
९) पुणे पाटबंधारे मंडळाकडील पत्र जा.क्र. पुपामं/प्रशा-२/१८९९/२०१८,दि.१५/०३/२०१८
१०)महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे यांचे अर्धशासकीय पत्र क्र.मकृखेविम/३७/ (८७०/२०१६)/(प्रशा-१)/सिं.व्य.२/०४, दि.०९/०१/२०१८
११) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/पापु/१२७३ दि. २०/३/२०१८ चे पत्र.
१२) मा.स्थायी समिती ठराव क्र. २४५६,दि.२०/३/२०१८

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पाटबंधारे विभागाकडून जादा औद्योगिक पाणी वापरासंदर्भात देऊ केलेल्या देयकांपोटी, पुणे महानगरपालिकेकडील हिशोबानुसार र. रु. ४८.२७ कोटी पैकी र. रु. १५ कोटी, व नवीन दरानुसार माहे मार्च २०१८ (ॲडव्हान्स) अदा करण्यासाठी कमी पडणारी रक्कम रु. २.५० कोटी असे एकूण र. रु. १७.५० कोटी वर्गीकरण करून पाटबंधारे विभागास अदा करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) खात्याने सुचविलेल्या खालीलप्रमाणे वर्गीकरणाच्या प्रस्तावास मान्यता मिळणेस

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक, मा.मुख्य अभियंता, पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग		
१) ZE16C102/PR2-1, राष्ट्रीय नदी सुधारणा अंतर्गत मुळा-मुठा सुधारणा कामे करणेसाठी मैलापाणी व्यवस्थापन विषयक योजना राबविणे (जायका)	१५ कोटी	---
२) XE23D119, 18. मुंढवा येथील पाण्याच्या पुर्नवापराची योजना	२.५० कोटी	---
नविन सुचविलेले काम- पाणी पुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका, **XE12A104,** ४. पाण्याची किंमत (पर्वती पंपिंग स्टेशन)	----	१७.५० कोटी

२) पाटबंधारे विभागाकडून जादा औद्योगिक पाणी वापरासंदर्भात देऊकेलेल्या देयकांपोटी, पुणे महानगरपालिकेकडील हिशोबानुसार र. रु. ४८.२७ कोटी पैकी र. रु. १५ कोटी, व नवीन दरानुसार माहे मार्च २०१८ (ॲडव्हान्स) अदा करण्यासाठी कमी पडणारी रक्कम रु. २.५० कोटी असे एकूण र. रु.१७.५० कोटी वर्गीकरण करून पाटबंधारे विभागास अदा करणेस.

<u>विषय क्र.१४/१०९०</u>

संदर्भ – १) मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे, उपमहापौर व मा.मारुती तुपे यांचे दि. १७/३/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. २४५७,दि.२०/३/२०१८

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे महानगरपालिकेचे वृत्त संकलन करणाऱ्या असंघटित,आर्थिक दुर्बल व दारिद्रय रेषेखालील आहे त्यांना सन २०१६ मार्च अखेर पी.एम.पी.एम.एल चा बस चा पास मोफत प्रवास करण्यासाठी दिला होता.

परंतु सन २०१७ च्या एप्रिल महिन्यापासुन सदरचा मोफत पास देणे बंद करण्यात आलेले आहे.मात्र पिंपरी चिंचवड महापालिकेतील पत्रकारांना मोफत बस पास देण्यात आलेला आहे.

तरी पिंपरी चिंचवड महापालिकेतील पत्रकारांना मोफत बस पास देण्यात आलेला आहे. पुर्वी प्रमाणे पुणे महानगरपालिकेचे वृत्त संकलन करणाऱ्या पत्रकारांना पी.एम.पी.एम.एल चा मोफत बस पास देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र.१५/१०९१</u>

८) मा.स्थायी समिती ठराव क्र. २४५८,दि.२०/३/२०१८

मा.स्थायी समिती ठराव क्र. २३४८ दि. १५/३/२०१८ चा फेरविचार करण्यात आला.

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २४३ अन्वये खालीलप्रमाणे पुणे महानगरपालिका क्षेत्रासाठी सार्वजनिक वाहनतळ धोरणास (पार्किंग पॉलिसीस) मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) एका कारच्या तुलनेने व्यापणारी जागा (ECS) प्रमाणे रस्त्यावरील व रस्ता बाहय वाहनतळाचे दर आकारणी करणेस.

वाहन	एका कारच्या तुलनेने व्यापणारी जागा (ECS)
दुचाकी	०.२०
पॅरा ट्रान्झीट (नियुक्त केलेल्या जागेव्यतिरिक्त), ऑटो रिक्षा इ.	०.६
चार चाकी	१.०
मालवाहू वाहन (टेंपो इ.)	१.०
मिनी बस / LCV	१.५
अवजड मालवाहू वाहन (ट्रक)	२.२
खासगी प्रवासी बस (१५ मीटर लांबीची)	३.९

२) सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत रस्त्यावरील पार्किंगसाठी पहिल्या ३ वर्षासाठी एका कारच्या तुलनेने व्यापणारी जागा (ECS) नुसार प्रति तास र.रु. १०/– व रस्ताबाहय पार्किंगसाठी र.रु.७/– प्रति तास दर आकारणेस. तसेच त्यानंतर पार्किंगचे दर हे पार्किंग दराच्या सुत्रानुसार आकारणेस व त्यानुसार अस्तित्वात असलेल्या पार्किंगचे कंत्राटाची पुनर्रचना (Revise) करणेस.

अ) खालीलप्रमाणे पार्किंग सूत्र ठरविणेः–

$P(t) = E \times r \times Tf \times Z \times$

यामध्ये

P(t) = ग्राहकाने पार्क केलेल्या कालावधीसाठी भरावयाचे पार्किंग शुल्क

E = समतुल्यकार अवकाश

r = एकासमतुल्यकार अवकाशासाठी ठरलेला मूळदर

Tf = वेळेचे मूल्य किमान मूल्य १ असून अधिक पार्किंग मागणीनुसार वाढविले जाईल.

Zx = पार्किंग मागणीनुसार झोन मूल्य. झोन अ साठी हे १ असून झोन ब आणि क साठी पार्किंग मागणीनुसार वाढविणेस.

ब) खालीलप्रमाणे पार्किंग मागणीचे दर ठरविणे :–

मागील ६ महिन्याच्या सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत होणाऱ्या सरासरी पार्किंगचे मागणीनुसार खालीलप्रमाणे दर प्रस्तावित केले आहेत.

झोन अ = कमी पार्किंग मागणी (६०% हून कमी पार्किंग मागणी)

झोन ब = अधिक पार्किंग मागणी (६०% ते ८०%)

झोन क = तीव्र पार्किंग मागणी (८०% ते १००%)

याप्रमाणे ठरलेले पार्किंग शुल्क हे जवळील रुपयाच्या संख्येनुसार पूर्ण संख्येत रुपांतर केले जाईल तंत्रज्ञानाद्वारे अंमलबजावणी होईपर्यंत Za = 1 , Zb =1.5 and Zc = 2

वाहन	एका कारच्या तुलनेने व्यापणारी जागा (ECS)	रस्त्यावरील पार्किंगचे मूळ दर प्रत्येकी एका तासाकरीता (रुपये)			रस्ताबाहय वाहनतळाचे मूळ दर प्रत्येकी एका तासाकरीता (रुपये)		
		Za = 1	Zb =1.5	Zc = 2	Za = 1	Zb =1.5	Zc = 2

३) रात्र निवासी पार्किंगसाठी रात्री १० ते सकाळी ८ या १० तासांच्या कालावधीसाठी एका कारच्या तुलनेने व्यापणारी जागा (ECS) नुसार र.रु. १० एका दिवसासाठी याप्रमाणे वार्षिक र.रु.३६५०/- एवढा दर लागू करणेस व याबाबतच्या वार्षिक परवाने देणेबाबतची कार्यवाही पुणे महानगरपालिकेमार्फत करणेस.

४) जुने अविकसित वाडे / जुनी वसाहत , इमारती / समाविष्ट गावातील जुन्या इमारती यासाठी रात्र निवासी पार्किंग रात्री १० ते सकाळी ८ या १० तासाच्या कालावधीसाठी ०.५ कारच्या तुलनेने व्यापणारी जागा (०.५ ECS) नुसार म्हणजेच र.रु.५.०० एका दिवसासाठी याप्रमाणे वार्षिक र.रु.१८२५/- एवढा दर लागू करणेस व याबाबतच्या वार्षिक परवाने देणेबाबतची कार्यवाही पुणे महानगरपालिकेमार्फत करणेस.

५) झोपडपट्टी वस्ती या ठिकाणी रात्र निवासी पार्किंग रात्री १० ते सकाळी ८ या १० तासाच्या कालावधीसाठी ०.२५ कारच्या तुलनेने व्यापली जाणारी जागा (०.२५ ECS) नुसार म्हणजेच र.रु.२.५० एका दिवसासाठी याप्रमाणे वार्षिक र.रु.९१०/- एवढा दर लागू करणेस व याबाबतच्या वार्षिक परवाने देण्याबाबतची कार्यवाही पुणे महानगरपालिकेमार्फत करणेस.

६) सदर रात्र निवासी पार्किंग परवाना उल्लंघन केल्यास खालीलप्रमाणे दंड आकारणेस.

अ) प्रथम वेळ :- मा.मुख्य सभा ठ.क्र.७११ दि.२०/१२/२०१७ अन्वये मान्य दरानुसार अतिक्रमण हटविण्यासाठी लागणारे शुल्क + (EX r) x 2 x उल्लंघन केलेले एकूण दिवस

ब) द्वितीय वेळ :- मा.मुख्य सभा ठ.क्र.७११ दि.२०/१२/२०१७ अन्वये मान्य दरानुसार अतिक्रमण हटविण्यासाठी लागणारे शुल्क + (EX r) x 4 x उल्लंघन केलेले एकूण दिवस

क) तृतीय वेळ :- मा.मुख्य सभा ठ.क्र.७११ दि.२०/१२/२०१७ अन्वये मान्य दरानुसार अतिक्रमण हटविण्यासाठी लागणारे शुल्क + (EX r)X 4 x उल्लंघन केलेले एकूण दिवस + सदर वाहन बेवारस म्हणून घोषित करुन प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडे सदर वाहनाचा परवाना रद्द करण्याबाबत कळविण्यात येईल .

७) फुटपाथ / सायकल ट्रॅक/ सायकल पार्किंग जागा या ठिकाणी पार्क केलेल्या वाहनांसाठी वाहन उचलून नेल्याची कार्यवाही केल्यास मा.मुख्य सभा ठ.क्र.७११ दिनांक २०/१२/२०१७ अन्वये कार्यवाही करणेस तसेच सदर वाहनास जागेवर जॅमर लावल्यास र.रु.२५००/- प्रति ECS यानुसार कारवाई करणेस.

८) पारदर्शकता आणि सुलभतेसाठी आधुनिक पार्किंग व्यवस्थापन तंत्रज्ञानाद्वारे पार्किंगचे व्यवस्थापन करणेस.

९) खालील वाहन प्रकारांना पार्किंग शुल्कातून सवलत देणेस.

अ) मान्यताप्राप्त रिक्षा वाहनतळावरील रिक्षा

ब) रुग्णवाहिका

क) दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली 'विशेष' वाहने

ड) सर्व प्रकारच्या सायकली

१०) संपूर्ण शहरामध्ये सार्वजनिक वाहनतळ धोरण (पार्किंग पॉलिसी) लागू करुन संपूर्ण शहराची विविध भागामध्ये विभागणी करुन प्रत्येक भागासाठी पार्किंग फी वसूल करण्यासाठी ठेकेदाराची नेमणूक करणेस.

११) पुणे शहरातील पार्किंग धोरणाबाबत यापूर्वी मा.मुख्य सभा ठ.क्र.२७३ दि.२४/११/२००९ अन्वये मान्य झालेला पार्किंग दराबाबतचा ठराव निरस्त करणेस.

पुणे महानगरपालिका क्षेत्राकरीता सार्वजनिक वाहनतळ धोरण असणे अत्यंत महत्वाची बाब असून शहर पर्यावरणाचा ऱ्हास होऊ न देता एक चांगली व सुरक्षित वाहतुक व्यवस्था निर्माण करण्यासाठी वाहतुक व्यवस्थेस पूरक असे वाहनतळ धोरण विकसित करुन त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. पुणे शहर व परिसरात होणाऱ्या भविष्यातील वाहनतळ सुविधा / सुधारणा विषयक बाबींचा अंतर्भाव हया धोरणात करण्यात आला आहे.पुणे महानगरपालिका क्षेत्राचा होणारा भविष्यकालीन विकास व वाहतुक यामध्ये सुधारणा होण्यासाठी या धोरणातील बाबी पुणे महानगरपालिकेकरीता महत्वपूर्ण धोरणाचे स्वरुप घेणार आहेत. सदर धोरण महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २४३ अ (१) प्रमाणे निर्दिष्ट केलेल्या ठिकाणी लागू राहील.

१२) पुणे शहरातील सर्व पार्किंग प्लॉट व उपलब्ध असलेल्या ॲमेनिटी स्पेस याबाबतचे सविस्तर प्लॅन मा.स्थायी समितीमध्ये दाखल करणेस